मिहान प्रकल्पास सुधारित प्रशासकीय
व वित्तीय मान्यता देण्यासंदर्भात.

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्र.मविवि-१२१९/प्र.क्र.२५/ २८-अ**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई ३२.
दि. ७ सप्टेंबर, २०१९.

**वाचा :** १.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एव्हीएन-१००१/ प्र.क्र.१०५/ २००१/२८-अ, दिनांक ०४.०१.२००२
२. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एव्हीएन-१००५/ प्र.क्र.१६६/०५/ २८-अ, दिनांक २६.०६.२००६
३. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एव्हीएन-१००५/ प्र.क्र.१६६/०५/ २८-अ, दिनांक ४.०७.२००९
४. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.एव्हीएन-१००८/ प्र.क्र.१७१/०८/ २८-अ, दिनांक १०.०३.२०१०
५. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मिहान-२०१०/ प्र.क्र.६४६/२८-अ, दिनांक ७.१०.२०११
६. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१०/ प्र.क्र.६४६/२८-अ, दिनांक ३.०३.२०१२
७.शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०११/ प्र.क्र.२६५/२८-अ, दिनांक ३०.०३.२०१२
८. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र. मिहान-२०१२/ प्र.क्र.३९९/२८-अ, दिनांक १२.१०.२०१५
९. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं/ मिहान/ पुनर्वसन/२०१८/०१५५३, दि.२०.०२.२०१९
१०. अप्पर जिल्हाधिकारी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई यांचे पत्र क्र. मविविकं/ मिहान/ पुनर्वसन/२०१८/७७१, दि.२६.०८.२०१९

**प्रस्तावना :**

नागपूर येथे आंतरराष्ट्रीय प्रवासी व माल वाहतूक हब विमानतळ विकसित करण्याच्या उद्देशाने शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, दि.४.०१.२००२ अन्वये, मिहान प्रकल्पासाठी मूळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून, त्यानंतर मिहान प्रकल्पाबरोबरच मुल्यवर्धी आर्थिक उलाढालींचा विकास करण्यासाठी विशेष आर्थिक क्षेत्र (SEZ) विकसित करण्यासह वेळोवेळी प्रकल्पात झालेल्या सुधारणांनुसार दि.२६.६.२००६, दि.४.७.२००९, दि.३.३.२०१२, दि.३०.३.२०१२ व दि.१२.१०.२०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये, सुधारित प्रशासकीय / वित्तीय मान्यता देण्यात आली आहे.

२. तथापि, मिहान प्रकल्पाकरीता आवश्यक असलेले अतिरिक्त भूसंपादन, प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनासाठी अतिरिक्त मागणी, प्रकल्पातील तांत्रिक कामे व भूसंपादन अधिनियमाचे कलम १८ व २८ अंतर्गत करण्यात आलेल्या दाव्यांकरीता रु.९९२.०९ कोटी इतका अतिरिक्त निधी मंजूर करण्याबाबत प्रस्ताव महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने शासनास सादर केला होता.सदर प्रस्तावास मान्यता मिळण्याच्या अनुषंगाने मंत्रिमंडळ प्रस्ताव मा.मंत्रिमंडळाच्या दि.२८.०८.२०१९ रोजीच्या बैठकीत मांडण्यात आला. सदर बैठकीत झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने मा.मंत्रिमंडळाने मिहान प्रकल्पातील भूसंपादन, पुनर्वसन, तांत्रिक कामे, भूसंपादन अधिनियमाचे कलम १८/२८ अंतर्गत करण्यात आलेले दावे इत्यादि कामांकरिता रु.९९२.०९ कोटी एवढ्या रकमेच्या अतिरिक्त खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता दिलेली आहे. यानुसार मिहान प्रकल्पास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्याबाबत खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

**शासन निर्णय :**

मिहान प्रकल्पातील विविध कामांकरिता रु.९९२.०९ कोटी एवढ्या रकमेच्या अतिरिक्त खर्चास शासन मान्यता देण्यात येत असून मिहान प्रकल्पासाठी येणाऱ्या एकूण रुपये २५००.४५ कोटी एवढ्या अपेक्षित खर्चास शासनाची सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने पुढील बाबींचा समावेश आहे.

अ) मिहान प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाकरिता एकूण रु.८७९.८६ कोटी खर्चास शासनाची सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

आ) मिहान प्रकल्पातील भूसंपादनासाठी रुपये ७०४.३१ कोटी खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

इ) मिहान प्रकल्पाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या भूसंपादन निवाडा रकमेच्या विरुध्द भूसंपादन कायदा कलम १८ खाली मा. न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या दाव्यांसाठी रु.६००.०० कोटी खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. तसेच, दिवाणी न्यायालयातील कलम १८ नुसार वाढीव नुकसानभरपाई मिळण्याच्या अनुषंगाने कलम २८ करिता दाखल दाव्यांसाठी रु.९५.०० कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

ई) भारतीय वायूदलाला मौजा जयताळा येथून पोच मार्ग उपलब्ध करून देण्यासाठी रु.५०.०० कोटी खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.

उ) प्रकल्प खर्चात होणारी १० टक्के वाढ यासाठी यापूर्वी रु.१३७.१२ कोटी प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. या खर्चामध्ये खापरी गावठाणाचे भूसंपादन व पुनर्वसन याकरीता रु.१००.०० कोटी खर्चाचा समावेश होता. तथापि, सदर खर्चासाठी आता पुनर्वसनाच्या व भूसंपादनाच्या इतर खर्चात स्वतंत्रपणे मागणी नोंदविण्यात आलेली असल्याने हा खर्च प्रकल्प खर्चात १० टक्के वाढ खर्चातून वगळण्यात येत आहे. त्यानुसार, मिहान प्रकल्पाच्या प्रकल्पखर्चात १० टक्के वाढ म्हणून **रु.१३६.४० कोटी** खर्चास सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

२. मिहान प्रकल्पातील अंदाजित पुनर्वसन खर्चाचा गोषवारा व मिहान प्रकल्पासाठी आवश्यक सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यतेबाबतची विवरणपत्रे अनुक्रमे **परिशिष्ट-अ** व **परिशिष्ट-ब** शासन निर्णयासोबत जोडलेली आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक क्र. २०१९०९०७१६२५०२३२०७ असा आहे. हे आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

Bharat Budhaji Gawade

Digitally signed by Bharat Budhaji Gawade
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=bc303d0b23c9b2e64564546661363400c4a360e6c6fbdefca273e2f5d2a43be7, serialNumber=af4e3993e4dd3610fcb21aece361e641ad3d33d96f04d57673c4fca72eb10c92, cn=Bharat Budhaji Gawade
Date: 2019.09.18 11:26:52 +05'30'

**( भ.बु.गावडे )**

**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत ,**

१. मा.मुख्यमंत्री यांचे अप्पर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (सामान्य प्रशासन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक
४. अप्पर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई.
५. अप्पर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय,मुंबई.
६. प्रधान सचिव, (विमानचालन), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई
७. संचालक, विमानचालन संचालनालय, मुंबई.
८. उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र विमानत विकास कंपनी, मुंबई
९. महालेखापाल, ( लेखा परीक्षा/ लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.
१०.जिल्हाधिकारी, नागपूर
११.उप सचिव, सामान्य प्रशासन विभाग (कार्या.२५), मंत्रालय, मुंबई
१२.उप संचालक, विमानचालन संचालनालय, जुहू विमानतळ, मुंबई
१३.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
१४.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१५.अतिरिक्त जिल्हाधिकारी, महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी, मुंबई
१६.सामान्य प्रशासन विभाग / कार्या.२५, मंत्रालय, मुंबई
१७.निवड नस्ती.

## शासन निर्णय क्र.मविवि-१२१९/ प्र.क्र.२५/२८-अ, दि. ७ सप्टेंबर, २०१९ सोबतचे परिशिष्ट-अ
## अंदाजित पुनर्वसन खर्चाचा गोषवारा

**(रु. कोटीत)**

| अ.क्र. | मुद्याचा संक्षिप्त विषय | मूळ प्रस्ताव | सुधारित प्रस्ताव |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | नागरी सुविधांच्या देखभालीकरिता येणारा खर्च | १.५० | ३१.३४ |
| २ | भूमिहीन शेतकऱ्यांकरिता येणारा खर्च | २२.९१ | २२.९१ |
| ३ | अत्यल्प भूधारकाकरिता येणारा खर्च | ०.१२ | ०.१२ |
| ४ | अल्प भूधारकाकरिता येणारा खर्च | ०.०५ | ०.०५ |
| ५ | शेतमजूर व मजूर कुटूंबाकरिता येणारा खर्च | ८.१६ | ८.१६ |
| ६ | प्रकल्पग्रस्त कुटुंबाच्या उदरनिर्वाहाकरिता येणारा खर्च | ११.९३ | १४.५३ |
| ७ | विस्थापितांच्या उदरनिर्वाहाकरिता देण्यात येणारा खर्च | ०.०० | ०.०० |
| ८ | आश्रित व निराधार व्यक्तींकरिता देण्यात येणारे अनुदान | १.१२ | १.१२ |
| ९ | प्रकल्पग्रस्त कुटुंबाच्या नोकरीकतिरा देण्यात येणारे अनुदान | ४४.५४ | ७१.२९ |
| १० | बाधित कुटुंबाच्या व्यक्तींना शिष्यवृत्तीकरिता येणारा खर्च | ०.०० | ०.०० |
| ११ | स्वयंरोजगारासाठी तांत्रिक व व्यावसायिक प्रशिक्षणाकरिता येणारा खर्च | २.९४ | २.९४ |
| १२ | १२.५ टक्के विकसित जमिन/ समकक्ष सानुग्रह अनुदानाकरिता प्रस्तावित खर्च (टिप- काही गावे दोन्ही प्रकल्पात येतात) | २६९.०० | २६९.०० |
| १३ | महसूल वन विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय दि.१७/०४/२००६ च्या अन्वये खर्च | | |
| | अ) सामान हलविण्यासाठी येणारा खर्च | १.९३ | २.४७ |
| | ब) गोठे बांधण्यासाठी येणारा खर्च | ०.२९ | ०.२९ |
| | क) दुकाने / शेड बांधण्यासाठी येणारा खर्च | ०.१६ | ०.१६ |
| १४ | पुनर्वसित गावाकरिता येणारा स्टॅम्प ड्युटी व रजिस्ट्रेशन फी करिता खापरी आणि चिंचभुवन व म्हाडा येथील अभिन्यासासाठी येणारा प्रस्तावित खर्च | ५०.७३ | ७०.७३ |
| १५ | घरबांधणी अनुदान | १२.४७ | ४३.९९ |
| १६ | अनुसूचित जमातीच्या कुटुंबाना अर्थ सहाय्य | ००.७१ | ००.७१ |
| १७ | शहरी भागातील प्रकल्पग्रस्तांचे चिंचभुवन व ग्रामीण भागाचे मौजा खापरी (रे.) येथे पुनर्वसन | २१६.०० | २१६.०० |
| १८ | मौजा-शिवणगांव गावठाण येथील प्रकल्पग्रस्तांची घरे रिकामी करून त्यांचे स्थलांतर करण्यासाठी दोन वर्षाचे घर भाडे देणेबाबत | ०.०० | १५.०० |
| १९ | मिहान पुनर्वसनाकामी (लवाद) करिता खर्च | ०.०० | ९८.३९ |
| २० | भामटी येथील प्रकल्पबाधीत लोकांना देय पुर्नवसन अनुदान | ०.०० | ५.६६ |
| २१ | उपरोक्त लाभार्थ्यांच्या संख्येत वाढ/ तफावत विचारात घेता अतिरिक्त मागणी | ०.०० | ५.०० |
| | **एकूण** | **६४४.०३ (अंदाजे)** | **८७९.८६ (अंदाजे)** |

शासन निर्णय क्र.मविवि-१२१९/ प्र.क्र.२५/२८-अ, दि. ७ सप्टेंबर, २०१९ सोबतचे
परिशिष्ट-ब

मिहान प्रकल्पासाठी आवश्यक सुधारित प्रशासकीय व वित्तीय मान्यतेचा तक्ता खालीलप्रमाणे सादर करण्यात येत आहे.

(रुपये कोटींत)

| अ.क्र. | खर्चाची बाब / प्रस्ताव | होणारा संभाव्य खर्च | सध्याची प्रशासकीय व वित्तीय मान्यता | अपेक्षित अंदाजित/ वाढीव निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | मिहान प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन | ८७९.८६ | ६४४.०३ | २३५.८३ |
| २ | दिवाणी न्यायालयातील वाढीव नुकसान भरपाई बाबतचे कलम १८ दाखल दावे. | ६००.०० | १००.०० | ५००.०० |
| ३ | दिवाणी न्यायालयातील कलम १८ नुसार वाढीव नुकसानभरपाई मिळण्याच्या अनुषंगाने कलम २८ करीता दाखल दावे. | ९५.०० | ------ | ९५.०० |
| ४ | भूसंपादन | ७०४.३१ | ५९२.३३ | १११.९८ |
| ५ | भारतीय वायुदलाच्या मौजा जयताळा येथील पोच रस्ता बांधकामासाठी | ५०.०० | ---------- | ५०.०० |
| ६ | झुडपी जंगल जमिनीचे निर्वनीकरण | २.३८ | २.३८ | -------- |
| ७ | फास्टट्रॅक कोर्टाची स्थापना | १.२३ | १.२३ | -------- |
| ८ | सानुग्रह अनुदान | | | |
| | अ) खापरी येथील भूसंपादनातुन सुटलेल्या ५९ घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव | ६.५२ | ६.५२ | -------- |
| | ब) कलकुही, दहेगांव, तेल्हारा या गावांतील गावठाणाबाहेरील २२७ अतिक्रमित जागेवरील घरांचा सानुग्रह अनुदान | १.५३ | १.५३ | -------- |
| | क) शिवणगांव येथील गावठाणातील व गावठाणबाहेरील ५६८ अतिक्रमित जागेवरील घरांचा सानुग्रह अनुदान प्रस्ताव | २०.५३ | २०.५३ | -------- |
| ९ | सिडकोच्या मेघदूत प्रकल्पाच्या विकास आराखडयासाठी व प्रशासकीय खर्च म्हणून सिडकोने खर्च केलेल्या निधीची प्रतिपूर्ती करणे. | २.६९ | २.६९ | -------- |
| १० | प्रकल्पखर्चात १० टक्के वाढ गृहीत धरून होणारी रक्कम (खापरी गावठाणाचे भूसंपादन व पुनर्वसन याकरीता यापूर्वी मान्यता देण्यात आलेले रु.१००.०० कोटीचा खर्च वगळून) | २३६.४० (वजा रु.१०० कोटी = १३६.४० कोटी) | १३७.१२ | ९९.२८ |
| | एकूण | २५००.४५ | १५०८.३६ | ९९२.०९ कोटी (रु.१००.०० कोटी वजा जाता) |